सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
## Maharashtra Water Resources Regulatory Authority

क्र. मजनिप्रा/२०१७/प्र.मा./विपाविम/१००/२२९ दिनांक : १४/०३/२०१९

प्रति,

मुख्य अभियंता (विप्र.),
जलसंपदा विभाग, सिंचन भवन,
शिवाजीनगर कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२.

विषय : बोर्डीनाला (मध्यम) प्रकल्प, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती
प्रकल्पाकरीता मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : प्राधिकरणाचे समक्रमांकित पत्र क्र. १६५ दि. २१/०२/२०१९

विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्रान्वये दि. ६ मार्च २०१९ रोजी दु. ३:०० वाजता सादरीकरण आयोजित केले होते. सदर सादरीकरण बैठकीचे इतिवृत्त पुढिल कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

सोबत - वरीलप्रमाणे

(रसिक चौहान)
सचिव, मजनिप्रा

प्रत माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी

१) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१.

२) अधीक्षक अभियंता, अमरावती पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सिंचनसेवा भवन, शिवाजीनगर कॅम्प, अमरावती - ४४४ ६०२.

## सादरीकरण बैठकीचे इतिवृत्त

विषय - बोर्डीनाला (मध्यम) प्रकल्प, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती प्रकल्पाकरीता मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत

दिनांक - ०६/०३/२०१९ वेळ - दु. ३:०० वाजता.

कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी दि. ०२/०१/२०१८ रोजीच्या पत्रान्वये बोर्डीनाला (मध्यम) प्रकल्प, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती प्रकल्पाकरीता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची (मजनिप्रा) मान्यता मिळणेबाबत सादर केला होता. प्राधिकरणाने दि. २७/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये काही मुद्द्यांच्या अनुपालनासाठी प्रस्ताव परत केला होता. का. सं. विपाविम, नागपूर यांनी दि. २५/०९/२०१८ व मु. अ. (विप्र) जलसंपदा विभाग, अमरावती यांनी दि. ३०/०१/२०१९ रोजी काही मुद्यांच्या अनुपालन अहवालासह प्रस्ताव फेरसादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशानुसार मुख्य अभियंता (विप्र) अमरावती यांचे दि. ०६/०३/२०१९ रोजी विषयांकित प्रकरणी एक सादरीकरण आयोजित करण्यात आले.

सदर सादरीकरणास उपस्थित असलेल्यांची यादी खालीलप्रमाणे आहे;

| मजनिप्रा | जलसंपदा विभाग |
|---|---|
| १) श्री. क.प्र. बक्षी, अध्यक्ष<br>२) श्री. वि.मा. कुलकर्णी, सदस्य (अभियांत्रिकी)<br>३) डॉ. शि.त्रिं. सांगळे, सदस्य (अर्थव्यवस्था)<br>४) श्री. रसिक चौहान, सचिव<br>५) श्री. रोहन सोडळ, उपसंचालक (नि) | १) श्री. रा.वि. जलतारे, मुख्य अभियंता (विप्र) अमरावती<br>२) श्री. सु.गो. राठी, कार्यकारी अभियंता, पा.प्र.ज.अ. विभाग, अमरावती<br>३) श्री. नि.शे. मावळे, सहा. अभियंता -१, बोर्डीनाला प्रकल्प उपविभाग, चांदूबाजार |

सदर सादरीकरण दरम्यान विषयांकित प्रकरणी सखोल चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान सादर केलेल्या प्रस्तावामध्ये Interstate Aspects ची पुर्तता करुन सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे मु. अ. (विप्र) अमरावती यांनी मान्य केले. त्यानुसार सादर केलेला प्रस्ताव परत घेण्याची विनंती केली. मा. अध्यक्ष यांनी त्यास अनुमती दिली.

सदर बैठक मा. अध्यक्ष यांचे आभार मानून संपन्न झाली.

---xxx---